श्री. बी.बी. लोंढे , उप अभियंता (यांत्रिकी)
(गट-अ) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ,
यांचा सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी कर्तव्य
कालावधी म्हणून मंजुर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन ज्ञापन क्रमांकः आपना-०२१७/प्र.क्र.२९४/पापु-१५

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१
तारीख: १ नोव्हेंबर, २०१७

वाचा -

१) शासन आदेश, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः आपना-२०१५/प्र.क्र.१५६/पापु-१५ दिनांक ४.७.२०१५
२) मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे पत्र क्र. ग्रापापु/ आ-१/०३/ २०१७ दिनांक ४.१.२०१७
३) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , पुणे यांचे पत्र क्र. प्रशासन/आस्था-५/बी.बी.लोंढे / उपअभि (यां)/२०६/२०१७ दिनांक १७.३.२०१७.
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे -१००१ /१३०/ सेवा -४ दिनांक २.६.२००३

ज्ञापन -

श्री. बी.बी. लोंढे, उप अभियंता (यांत्रिकी) यांची जिल्हा परिषद, रायगड येथून जिल्हा परिषद, अहमदनगर येथे श्री. एम.आर. लाड, उप अभियंता (यांत्रिकी) यांचे जागी संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये बदली करण्यात आली होती. या आदेशाप्रमाणे श्री. बी.बी.लोंढे हे दिनांक २०.७.२०१५ रोजी जिल्हा परिषद, अहमदनगर कार्यालयात हजर झाले व त्यांनी रुजु अहवाल सादर केला. परंतु श्री. एम. आर. लाड, उपअभियंता (यां) यांनी पाणी टंचाईचे कालावधीत सदर जिल्हयात काम पाहिले असल्याने त्यांना कार्यमुक्त न करण्याचा ठराव जिल्हा परिषदेने पारित केल्याने, जिल्हा परिषद अहमदनगर कार्यालयातून श्री. लाड यांना दिनांक ६.८.२०१५ रोजी कार्यमुक्त केले व यानंतर श्री. लोंढे यांना रुजु करुन घेतले.

२. श्री. लोंढे यांना जिल्हा परिषद, अहमदनगर येथे दिनांक २०.७.२०१५ रोजी रुजु करुन न घेता दिनांक ६.८.२०१५ रोजी रुजु करुन घेतले. श्री. लोंढे यांना याच पदावरील बदली झालेले श्री. एम.आर. लाड यांना कार्यमुक्त करुन त्यांचे जागी रुजु करुन पदस्थापना देण्यासाठी झालेला

विलंब हा प्रशासकीय कारणास्तव झालेला असुन सदर कालावधी हा सक्तीचा प्रतिक्षा कालावधी ठरतो. दिनांक २०.७.२०१५ ते दिनांक ६.८.२०१५ हा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्व साधारण शर्ती) नियम १९८१, नियम ९ मधील १४ (एफ) मधील तरतूदी नुसार त्यांचा “कर्तव्य कालावधी" म्हणून नियमित करण्यास शासन मान्यता देत आहे.

३. शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक सेनिवे -१००१ /१३०/ सेवा -४ दिनांक २.६.२००३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने हे ज्ञापन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर ज्ञापन, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०३११५००२५९५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2017.11.01 13:47:22 +05'30'

चेतन निकम
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
२. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक
३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहमदनगर
४. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर
५. संबंधितास
६. निवड नस्ती (कार्यासन -पापु-१५) , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.